डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची बाभुळगाव येथील २७ हे. जमिन महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याबाबत......

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक : पंदेवि १३१८/प्र. क्र.९१/७अे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १५ जुलै, २०१९.

<u>प्रस्तावना :-</u>

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील कलम ३ (३) मध्ये "प्रत्येक विद्यापीठ, जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन व धारण करण्यास, विद्यापीठाच्या प्रयोजनासाठी त्यांच्याकडे निहित असेल किंवा त्यांच्याकडून संपादन करण्यात येईल अशी कोणतीही जंगम किंवा स्थावर मालमत्ता पट्टयाने देण्यास, विकण्यास किंवा अन्यथा हस्तांतरीत करण्यास किंवा तिची विल्हेवाट लावण्यास व या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा इतर सर्व बाबी करण्यास सक्षम असेल" अशी तरतूद असून कलम ३ (३) च्या परंतुकानुसार कृषी विद्यापीठाकडील स्थावर मालमत्ता अशा रितीने पट्टयाने देणे, तिची विक्री करणे किंवा ती हस्तांतरीत करणे या बाबी राज्य शासनाच्या पूर्वसंमतीशिवाय केल्या जाणार नाहीत अशी तरतूद आहे.

सदर तरतूदीनुसार डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठा अकोला विद्यापीठाच्या दि. २८.५.२०१८ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी परिषदेमध्ये ठराव क्र. काप/५३/२०१८ अन्वये सुधारीत ठराव पारित करुन , महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाने मागणी केलेली विद्यापीठातील मध्यवर्ती संशोधन केंद्रातील महामार्ग विभागाची २७ हे. जमिन महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर यांना देण्यास व त्या मोबदल्यात महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर यांचे अंतर्गत असलेली बोरगाव मंजु येथील २७ हे. जमिन डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठास हस्तांतरीत करण्याच्या अटिस अधिन राहुन मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच याबाबत कृषि परिषदेच्या ९७ व्या बैठकीमध्ये विषय क्र. ३९ नुसार ठराव क्र. ३६/९७/२०१८ अन्वये उक्त प्रस्तावाबाबत ठराव पारीत करुन शासनाकडे शिफारशीत करण्यात आलेला आहे. सबब प्रस्तुत प्रस्तावाबाबत महसूल व वन विभागाने दिलेले अभिप्राय विचारात घेवून, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची मध्यवर्ती संशोधन केंद्रातील महामार्ग विभागाची २७ हे. जमिन महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर यांना हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने ठराव क्र. काप/५३/२०१८, दि. २८.५.२०१८ आणि कृषि परिषदेने ठराव क्र. ३६/९७/२०१८, दिनांक २३.१०.२०१८ अन्वये दिलेली मान्यता तसेच महसूल व वन विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार, महाराष्ट्र

पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत बाभुळगाव येथील सर्व्हे नं. २१९ मधील ०.८६ हे., सर्व्हे नं. २२० मधील ५.६८ हे., सर्व्हे नं. २४२ मधील ४.५४ हे, सर्व्हे नं. २४१ मधील ४.८५ हे, सर्व्हे नं. २३६ मधील ३.४४ हे., सर्व्हे नं. २३५ मधील ४.९४ हे., सर्व्हे नं. २४६ मधील २.६९ हे. अशी एकूण २७ हे. जमिन खालील अटींच्या अधिन राहून महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात येत आहे.

अटी व शर्ती..

१) उपरोक्त प्रमाणे महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करण्यात आलेली बाभुळगाव येथील डॉ . पंजाबराव देशमुख कृषिविद्यापीठअकोला , विद्यापीठाची एकुण २७ हे. जमीन, महसूल व वन विभागाने महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत अकोला येथे नविन पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापनेसाठी महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांना प्रदान करावी.

२) उपरोक्त जमीनीच्या बदल्यात महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ ,नागपूर यांनी त्यांचे अंतर्गत असलेली बोरगाव मंजु येथील सर्व्हे क्र १२६ .व जमीन .हे २७ मधील १४० डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला यांना हस्तांतरीत करण्यासाठी महसूल व वन विभागास प्रत्यार्पित करावी. सदरची जमीन महसूल व वन विभागाने डॉपंजाबराव देशमुख कृषि . अकोला ,विद्यापीठ विद्यापीठास प्रदान करावी.

३) सदर जमिन ही ज्या कारणासाठी हस्तांतरीत करण्यात आली आहे त्याच कारणासाठी तिचा वापर करावा.

४) प्रत्यार्पित करण्यात आलेली जमीन महसूल व वन विभागाने किंवा महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपूर यांनी इतरांना हस्तांतरीत करु नये तसेच त्रयस्थ पक्षकारांचा कोणताही हितसंबंध, हक्क निर्माण करु नये .

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०७१५१५३९०८४६०१ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Gite Pratap Venkatrao

Digitally signed by Gite Pratap Venkatrao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Animal Husbandry, Dairying and Fisheries Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fa90705dc27d17e7f5a948e535706ff2c3a1f6c3212fbe679cdac2da9677bb72, serialNumber=707437d6d784d92730d943579bec96a06c8b9d1b0f545fe42541583be9e598cd, cn=Gite Pratap Venkatrao
Date: 2019.07.15 15:50:36 +05'30'

(प्रताप गिते)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल-नि-कुलपती यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा.मंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.राज्यमंत्री (कृषी) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. सचिव (कृषी), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. मा. अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७. मा. प्रधान सचिव (पदुम), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
८. महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे,
९. कुलगुरु/कुलसचिव/नियंत्रक,डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला,
१०.कुलगुरु/कुलसचिव, महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ, नागपुर
११.विभागीय आयुक्त, अमरावती
१२.जिल्हाधिकारी, अकोला
१३.जिल्हा कोषागार अधिकारी, अकोला
१४.निवड नस्ती, कार्यासन ७-अे, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.